# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/पदविका प्रवेश २०१९-२०/२०१९/ ७५५५ | दिनांक : ०३.०४.२०१९.

**परिपत्रक:**

04 APR 2019

प्राचार्य,
पुणे विभागातील पोस्ट एस.एस.सी. व पोस्ट एच.एस.सी.
**पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता प्रथम व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी., पोस्ट एच.एस.सी. पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी विनाअनुदानित संस्थांना प्रवेश निश्चिती केंद्र (ARC) ठरविण्याबाबत..**

**संदर्भ : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/(प्र.क्र. ०६/०९)/तांशि-५ दिनांक ०६.०२.२०१९.**

**२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १०/पदविका/प्रवेश निश्चिती केंद्र/२०१९/३२२ दिनांक २२.०३.२०१९.**

उपरोक्त विषयास अनुसरुन नमुद करण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई येथे दिनांक ०४.०१.२०१९ रोजी झालेल्या बैठकीनुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम व थेट द्वितीय पोस्ट एस.एस.सी., पोस्ट एच.एस.सी. पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ज्या विनाअनुदानित पदविका संस्थांना NBA Accreditation प्राप्त झाले आहेत. अशा विनाअनुदानित पदविका संस्थांमधील इतर आवश्यक त्या बाबींची पडताळणी करुन सदर संस्थांना सुध्दा प्रवेश निश्चिती केंद्र (ARC) देणेबाबत सुचविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने पुणे विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या सर्व पोस्ट एस.एस.सी. व पोस्ट एच.एस.सी. पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता ज्या संस्थांना **प्रवेश निश्चिती केंद्र** म्हणून काम करावयाचे आहे, अशा संस्थांनी खालील बाबींची पूर्तता करीत असल्यास या विभागीय कार्यालयाकडे दिनांक **१०.०४.२०१९ पूर्वी** प्रस्ताव सादर करावेत. अतिंम दिनांकानंतर आलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

१. NBA Accreditation प्राप्त झाले आहे का? (असल्यास प्रमाणपत्र जोडण्यात यावे)
२. संस्था ज्या परिसरात आहे, त्या परिसरामध्ये केंद्राची आवश्यकता आहे याबाबतचे समर्थनीय कागदपत्रांसह निवेदन.
३. संस्थेतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा प्रलंबित प्रश्न व त्याअनुषंगाने न्यायालयीन प्रकरण याबाबतचा तपशील देण्यात यावा. प्रलंबीत प्रश्न व त्या अनुषंगाने न्यायालयीन प्रकरणे नसल्यास तसे प्रमाणपत्र संस्था व्यवस्थापनाचे अध्यक्ष/सचिव यांचे स्वाक्षरीने देण्यात यावे.
४. प्रवेशाबाबत संस्थेवर कार्यवाही झालेली असल्यास त्याचा तपशील देण्यात यावा.
५. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ तसेच २०१७-१८ करीता संस्थेस प्राप्त ई.बी.सी./वसतीगृह रकमांचे उपयोगिता प्रमाणपत्र या विभागीय कार्यालयास सादर केलेले असणे आवश्यक.
६. प्रवेश निश्चिती केंद्र म्हणून काम करण्यासाठी संस्थेकडे उपलब्ध असलेली व्यवस्था.

Gaikwad ४.४.१९

f प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

D:\Yogesh Kelkar\Admission 19-20\Circular for ARC 2019_20.docx